# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ९५ वा ❑ शुक्रवार दि.२३ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## गरिबांच्या घरांची स्वप्नं साकार होणार !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सर्वसामान्य लोकांच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. सर्वसाधारण जनतेला आपले घर असावे असे वाटत असते. परंतु पैशाअभावी, रोजगारा अभावी आणि गरिबीमुळे सर्वसामान्यांच्या घराची स्वप्ने साकार होत नाही. मात्र सर्वसामान्यांच्या घराच्या स्वप्नाला आता नवे बळ मिळणार आहे. राज्य सरकारने नवीन गृह निर्माण योजना आणली आहे.

माझे घर, माझा अधिकार हे धोरण आता राबविण्यात येणार आहे.

राज्यातील शहरी गृहनिर्माणाची पुनर्व्याख्या करण्याच्या उद्देशाने एका ऐतिहासिक निर्णयात, महाराष्ट्र मंत्रिमंडळाने माझे घर – माझा अधिकार (माझे घर – माझा हक्क) या शीर्षकाच्या राज्य गृहनिर्माण धोरण २०२५ ला मान्यता दिली आहे. या व्यापक धोरणात २०३० पर्यंत ३५ लाख परवडणारी घरे बांधण्याची महत्त्वाकांक्षी योजना मांडण्यात आली आहे, ज्यामध्ये अंदाजे ७०,००० कोटी रुपये गुंतवणुकीचा समावेश आहे, जो २००७ नंतरचा सर्वात महत्त्वाचा गृहनिर्माण उपक्रम आहे.

समावेशक आणि शाश्वत घरांच्या वाढत्या मागणीला तोंड देण्यासाठी डिझाइन केलेले, हे धोरण आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि कमी उत्पन्न गट वर लक्ष केंद्रित करते, तर विद्यार्थी, नोकरदार महिला, सरकारी कर्मचारी आणि औद्योगिक कामगारांसह इतर विविध घटकांना लाभ देते. याव्यतिरिक्त, राज्याच्या वेगाने शहरीकरण होणाऱ्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी दहा वर्षांच्या कालावधीत ५० लाख घरे बांधण्याचे धोरण उद्दिष्ट ठेवते.

या धोरणातील एक प्रमुख नवोपक्रम म्हणजे भाड्याने घर घेणे हे मॉडेल, जे पात्र व्यक्तींना दहा वर्षांपर्यंत भाड्याने घरे देण्याची परवानगी देते आणि नंतर ती खरेदी करण्याचा पर्याय देखील देते. या तरतुदीमुळे विशेषतः विद्यार्थी, रुग्णालयातील कर्मचारी आणि कामगार दलातील महिला यासारख्या फिरत्या आणि स्थलांतरित लोकसंख्येला फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

जुन्या इमारतींचा स्वयं-पुनर्विकास करण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांना सक्षम करण्यासाठी, राज्याने २,००० कोटींची तरतूद केली आहे आणि स्वयं-पुनर्विकास कक्षाची स्थापना करण्याचा प्रस्ताव दिला आहे. हा कक्ष खाजगी विकासकांवर अवलंबून न राहता पुनर्विकासाला प्रोत्साहन देऊन, नियोजन, निधी आणि अंमलबजावणीमध्ये सोसायट्यांना मदत करेल.

या धोरणाचे एक प्रमुख केंद्रबिंदू म्हणजे हवामान-लवचिक आणि हरित गृहनिर्माण पायाभूत सुविधांचा विकास. शाश्वत आणि आपत्ती-प्रतिरोधक बांधकाम तंत्रांना प्रोत्साहन देण्यासाठी ग्लोबल हाऊसिंग टेक्नॉलॉजी चॅलेंज पद्धती एकत्रित करण्याची सरकारची योजना आहे. हे प्रयत्न महाराष्ट्राच्या व्यापक हवामान अनुकूलन धोरणाशी सुसंगत आहेत, विशेषतः उष्णतेच्या लाटा, पूर आणि भूकंपाच्या घटनांना बळी पडणाऱ्या शहरांमध्ये.

या धोरणाचा एक मध्यवर्ती घटक म्हणजे राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल तयार करणे, जे सर्व गृहनिर्माण-संबंधित डेटासाठी डिजिटल आधार म्हणून काम करेल. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे समर्थित, घरांची मागणी आणि पुरवठा, निधी वाटप, जमीन अधिग्रहण आणि प्रकल्प स्थिती यावरील भौगोलिक-टॅग केलेली माहिती एकत्रित करेल. हे पोर्टल महारेरा, महाभुलेख आणि पीएम गति शक्ती सारख्या प्रणालींशी एकत्रित केले जाईल, ज्यामुळे पारदर्शकता आणि वास्तविक-वेळ प्रशासन सुनिश्चित होईल.

या धोरणात वॉक टू वर्क ही संकल्पना देखील समाविष्ट आहे, ज्यामध्ये औद्योगिक क्षेत्रातील १०% ते ३०% जमीन निवासी कारणांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. औद्योगिक क्षेत्रातील कामगारांसाठी प्रवासाचा वेळ कमी करणे आणि कामाचे आयुष्य संतुलन वाढवणे हा यामागील उद्देश आहे.

शहरी गरिबांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, धोरण क्लस्टर-आधारित झोपडपट्टी पुनर्वसनाला प्रोत्साहन देणे ज्याचा उद्देश नियोजित पायाभूत सुविधांसह अनौपचारिक वसाहतींचे पुनरुज्जीवन करणे हा आहे. ही योजना सर्व समावेशक १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व महानगरीय प्रदेशांमध्ये लागू होणार आहे.आता प्रतीक्षा आहे.या धोरणाच्या अंमलबजावणीची. सरकार अनेक योजना जाहीर करत असते. मात्र त्याची अंमलबजावणी होत नसते. झाली तरी त्याचा लाभ सर्व सामान्य जनतेला होत नसतो. गृह निर्माण धोरण अतिशय पारदर्शक पद्धतीने राबविण्याची गरज आहे.

# सामर्थ्य असेल तरच जग ऐकते प्रेमाची भाषा

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**जयपूर** – जर तुमच्याकडे सामर्थ्य असेल तरच जगही तुमची प्रेम, कल्याण व मांगल्याची भाषा ऐकते. हे जगाचे स्वरूप आहे. ते बदलता येत नाही. म्हणूनच विश्वाच्या कल्याणासाठी आपण शक्तिशाली असण्याची आवश्यकता आहे. भारत हा जगातील सर्वांत प्राचीन देश आहे. त्याची भूमिका मोठ्या भावाची आहे. भारत जगात शांतता आणि सौहार्दासाठी काम करीत आहे, असे स्पष्ट प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले. जयपूरमधील हरमाडा येथील रविनाथ आश्रमात रविनाथ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

सरसंघचालक म्हणाले, या आश्रमाच्या व्यासपीठावर मला कोणत्याही सन्मानाचा अधिकार नाही आणि भाषण देण्याचाही अधिकार नाही आणि जर आदर द्यायचाच असेल तरी मी एकटा काहीही करत नाही. कार्याची ही परंपरा गेल्या १०० वर्षांपासून सुरू आहे. त्या परंपरेत लाखो कार्यकर्ते आहेत. प्रचारकांप्रमाणेच गृहस्थाश्रमी कार्यकर्ते देखील आहेत. इतक्या सगळ्या कार्यकर्त्यांच्या कठोर परिश्रमाचे फळ म्हणून जर काही स्वागतार्ह आणि आदरास पात्र असेल तर ते म्हणजे या कार्यकर्त्यांचा सन्मान. संतांच्या आज्ञेनेच मी हा सन्मान स्वीकारत आहे.

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, भारतात त्यागाची परंपरा राहिली आहे. भगवान श्रीरामांपासून भामाशाहपर्यंत सर्वच आम्हाला पूजनीय आणि वंदनीय आहेत. विश्वाला धर्म शिकवणे हे भारताचे कर्तव्य आहे, परंतु त्यासाठी देखील सामर्थ्याची आवश्यकता असते. भारत कोणाचाही द्वेष करीत नाही. परंतु जर तुमच्याकडे सामर्थ्य असेल तरच जग प्रेम, कल्याण व मांगल्याची भाषा ऐकते. म्हणून जगाच्या कल्याणासाठी आपण शक्तिशाली असले पाहिजे आणि जगाने आमचे सामर्थ्य पाहिले आहे. विश्वकल्याण हा आमचा धर्म आहे.



विशेषतः हिंदू धर्माचे ते एक कठोर कर्तव्य आहे. ही आमची ऋषी परंपरा राहिली आहे, जी संत समुदाय पुढे नेत आहे. रविनाथ महाराजांसोबतचे आपले अनुभव सांगताना सरसंघचालक म्हणाले की, त्यांची करुणा आम्हाला जीवनात चांगले काम करण्याची प्रेरणा देते.

कार्यक्रमात भावनाथ महाराज यांनी सरसंघचालकांचा सत्कार केला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते

# "सृजन" या अत्याधुनिक मातृ व बाल विभागाचे थाटात उद्घाटन

## रुग्णालयाचे आणखी एक पाऊल माता व बाल सुरक्षेच्या दिशेने

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – मराठवाडा मेडिकल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अंतर्गत असलेले कमलनयन बजाज रुग्णालय नेहमीच रुग्णांना अद्ययावत सुविधा देण्यास कटिबद्ध आहे. रुग्णालयाने आज "सृजन" या नव्या मातृ व बाल आरोग्य विभागाचा भव्य शुभारंभ केला.

या उद्घाटन सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून आदरणीय ट्रस्टी



नंदकिशोरजी कागलिवाल उपस्थित होते. त्यांच्या सोबत ब्रिगेडियर विरेंद्र सिंग व कर्नल शरद भल्ला हे मान्यवर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

"सृजन" ही सुविधा मातांना व बालकांना परिपुर्ण, आधुनिक व उच्च दर्जाची आरोग्यसेवा देण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. येथे कायमस्वरूपी स्त्रीरोगतज्ज्ञ, डॉ. प्रेरणा देवधर, डॉ. वेदयात्री देशमुख, डॉ. अमृता थेटे, बालरोगतज्ज्ञ डॉ. निखिल पाठक, डॉ. अभिजित जोशी. डॉ. आशिष थेटे हे आधुनिक नवजात शिशु देखभाल, तसेच रोबोटिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञान उपलब्ध आहे. या प्रसंगी हॉस्पिटल प्रशासनाने सांगितले की "सृजन" ही सुविधा त्यांच्या दर्जेदार व प्रेमळ सेवांचा विस्तार असून, कमलनयन बजाज हॉस्पिटल हे मातृ व बाल आरोग्य सेवेत उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून नावारूपास येईल.

हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाने सर्व उपस्थित मान्यवर, मीडिया प्रतिनिधी व शुभेच्छुकांचे आभार मानले. "ही सुविधा केवळ इमारतीपुरती मर्यादित नाही, तर विश्वास, सुरक्षितता आणि प्रत्येक कुटुंबासाठी आशा निर्माण करण्यासाठी आहे," असे सीईओ डॉ. जॉर्ज फर्नांडिस यांनी सांगितले.

# पिंपळनेरचे भूमीपूत्र प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर (रमाईसुत) यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



पिंपळनेरचे भूमिपूत्र कवी तथा बालसाहित्यिक प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर ( प्रदिप बाबुलाल पगारे) हे रमाईसुत या टोपन नावाने कविता , लेख व साहित्य लेखन करतात. त्यांच्या ३० वर्षातील शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना जीवनगौरव पुरस्काराने नाशिक येथे सन्मानित करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील काळीज माझं साहित्य या साहित्य संस्थेच्या नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या ८ जुन २०२५ रोजी राज्यस्तरीय काव्यसंमेलनात विविध जेष्ठ मान्यवरांच्या हस्ते कवी- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे नुकतेच संस्थेचे निवडपत्र प्राप्त झाले आहे.

प्रदिपगुरुजी हे पेशाने शिक्षक असून नुकतेच त्यांच्या दोन्ही पायांवर मोठी शस्त्रक्रिया झालेली आहे. अंथरुणाला खिळवून असतांनाही त्यांनी या काळात यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त दोन काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्यापैकी " बालमित्रांची छान छान गाणी" हा बालकाव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर असून " लाल पाणी निळे रक्त" या

काव्यसंग्रहाच्या लेखनाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच या काळात त्यांनी ३०० पेक्षा जास्त कवितेची रचना करून १५०-२०० सन्मानपत्रे प्राप्त केली आहेत. तसेच विविध ऑनलाइन काव्यसंमेलनात सहभाग घेऊन विविध पारितोषीके प्राप्त केली आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल आजारपणाच्या काळात यांना ४-५ पुरस्कारांनी देखील गौरवण्यात आलेले आहे.

आजारपणात त्यांचा १० प्रातिनिधिक काव्यसंग्रहात देखील कवितेचा सहभाग आहे. त्यात पाऊस, मधुगंध, क्रांतीज्योती, वारसा, येरे येरे ढगोबा( बालकाव्यसंग्रह), भीम जन्माची गाथा, रानफूल, वसंत ऋतू, आठवणीचा कोपरा व दर्पण या प्रातिनिधिक काव्यसंग्रहांचा समावेश आहे.

विशेष बाब म्हणजे त्यांच्या " बालमित्रांची छान छान गाणी" या बालकाव्यसंग्रहाच्या १००० प्रती छत्रपती संभाजीनगर जिल्हातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत मोफत भेट देण्यात येणार आहे. त्याकरिता त्यांनी " मानवता बुक फाऊंडेशन" ची निर्मिती केली असून आपल्या प्रियजनांच्या नावे फक्त १००० प्रतींचा छपाई खर्च देणगी देऊन यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्रातील कोणत्याही एका जिल्हासाठी १००० प्रती वाटाण्यात. यात पहिल्या पानावर त्यांच्या प्रियजनांचा फोटो व त्यांच्या स्मरणार्थ मोफत

बालकाव्यसंग्रह वाटप. तर शेवटच्या पानावर ज्यांच्याकडून देणगी मूल्य प्राप्त झाले यांचा नामोल्लेख पुस्तकात असणार आहे.

या उपक्रमाची सुरुवात गुरुजींच्या मातोश्रींनी केलेली असून कै. बाबुलाल सखाराम पगारे पिंपळनेरकर यांच्या स्मरणार्थ छत्रपती संभाजीनगर जिल्हातील संपूर्ण जिल्हा परिषद शाळेसाठी श्रीमती रमादेवी बाबुलाल पगारे यांचेकडून देणगी मूल्य प्राप्त झालेले आहे. आपल्या राज्यातील इतर जिल्हांसाठी आपण ९८२३११३५९४ या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधून सविस्तर माहिती घेऊ शकता.

प्रदिपगुरूजी यांना यापूर्वी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरचा आदर्थ शिक्षक पुरस्कार २०१४, लायन्स क्लब ऑफ औरंगाबादचा श्रेष्ठ गुरुजन पुरस्कार, विद्यार्थी सहायता संघ मुंबईचा साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, मनुष्यबळ विकास अकादमीचा अष्टक्षेत्री गौरव पुरस्कार, अनिस कार्यगौरव राज्य पुरस्कार, मानव प्रबोधन अकादमीचा राज्य पुरस्कार, तसेच पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत आंतरराष्ट्रीय पुरस्कार या विविध पुरस्कारांनी यापूर्वी यांचा सन्मान झालेला आहे.

गुरुजींनी आतापर्यंत ४५ वेळा रक्तदान केलेले असून समाजाचा रुहभाग म्हणून १५-१७ लाखांपर्यन्त लोकवर्गणीतून विविध शाळांचा कायापालट केलेला आहे. यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यास आमचा मानाचा मुजरा.

# उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती?

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच




अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे.

काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

***






– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...

## पैशाप्रमाणे वेळ साठवून ठेवता येत नाही


**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या सर्वांना सारखेच एका दिवसाचे चोवीस तास मिळतात. काही लोक इतरांपेक्षा त्यांच्या उपलब्द वेळेत अधिक साध्य करत असतात. वेळेचे चांगले, योग्य व्यवस्थापन हेच त्यामागचे मुख्य कारण असते. टाइम मॅनेजमेंट म्हणजे तुमचा वेळ वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटींमध्ये कसा विभागायचा याचे आयोजन आणि नियोजन करण्याची प्रक्रिया आहे. त्याचे ज्ञान आपल्याला बरोबर मिळवावे लागते आणि कमी वेळेत अधिक काम करण्यासाठी आपण अधिक हुशारीने काम करणे कठीण नसते. वेळ कमी असताना आणि दबाव जास्त असतानाही आपण करत असलेल्या कामात यश प्राप्त होऊ शकते. सर्वोच्च यश मिळविणारे त्यांचा वेळ अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करतात.

मनाच्या उच्च साधनेच्या वेळेच्या व्यवस्थापन संसाधनांचा वापर करून, आपण देखील आपल्या वेळेचा पुरेपूर उपयोग करू शकतो. आपला वेळ प्रभावीपणे कसा व्यवस्थापित करायचा हे आपल्याला माहिती करून घेणे आवश्यक असते. त्याचे अनेक फायदे आपल्याला प्राप्त होऊ शकतात. एकंदरीत, तुमचा वेळ सर्वोत्तम कसा वापरायचा हे निवडण्याच्या पद्धतीमुळे आत्मविश्वासाने आपण अधिक नियंत्रणात राहू शकतो आणि सर्वोच्च यश संपादित करू शकतो. आपल्यामध्ये अधिक आनंदी, आरामशीर राहून देखील सखोल विचार करण्याची क्षमता असल्याने आपण अधिक सक्षम होऊ शकतो. इतरांना त्यां च्याचलक्ष्यां पर्यंत पोहोचण्याशस मदत करण्यागसाठी आपणा उत्तम मार्गदर्शक ठरू शकतो.

आपल्या मन:शक्तीमध्ये एकूणच वेळ व्यवस्थापन सुधारण्यासाठी डिझाइन केलेली, परिपक्वता असलेली संसाधने आणि मनाची प्रगल्भता असते. सामान्य वेळ-व्यवस्थापन आव्हानांसाठी व्यावहारिक उपाय देतात, तसेच मुख्य सवयी अधिक चांगल्यासाठी आपले विचार, वर्तन आणि व्यवहार बदलण्याचे योग्य मार्ग दाखवतात. आपण अधिक संघटितपणे कार्य करू शकतो.

## आनंदाची फुले वाटणारे झाड...




**ज्योतिर्मय साहित्य**

आज मी बोलणार आहे महाराष्ट्राच्या त्या लाडक्या व्यक्तिमत्वाबद्दल. ओळखलंच असेल तुम्ही. आपले ते भाई हो. म्हणजेच सर्वांचे लाडके पुलं. तर आज त्यांचे एक दोन किस्से सांगून मी तुमची सकाळ आनंदी करणार आहे. पुलं म्हणजे मोठे साहित्यिक, गायक, वादक, संगीतकार, वक्ता. एक अष्टपैलू व्यक्तिमत्व. पण अशी माणसं माणूस म्हणून सुद्धा किती मोठी असतात, ते दर्शविणारी ही घटना. मधू गानू यांनी पुलंना माणसांनी मोहरलेलं झाड असं त्यांच्या पुस्तकात म्हटलं आहे. ते खरंच आहे. कारण पुलंच्या घरी सतत गायक, वादक, कलाकार, साहित्यिक, त्यांचे चाहते इ. चा सतत राबता असायचा. पण पुलं आणि सुनीताबाई न कंटाळता त्या सर्वांची सरबराई करत असायचे. जसं रानातलं एखादं चवदार आणि थंड पाण्याचं तळं असावं, आणि त्या तळ्यावर येऊन प्रत्येकानं आपली तहान भागवावी, तसे पुलंकडे येऊन प्रत्येकजण समाधानी आणि आनंदी होऊन जायचा. पण कधी कधी हे तळच तृषार्तांकडे आपण होऊन जायचं. एक प्रसंग घडला तो असा.




पुलं इचलकरंजीच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. या संमेलनात वारणानगरची काही मुले येऊन आपली कला सादर करणार होती. पण काही कारणाने ती मुले संमेलनात येऊ शकली नाहीत. पुलंना हे कळले तेव्हा त्यांनी संमेलन आटोपल्यानंतर त्या मुलांच्या भेटीसाठी जाण्याचे ठरवले. आणि ते वारणानगरला गेले. जणू पुंडलिका भेटी परब्रह्म आले. त्यांना पाहिल्यावर मुलांचा आनंद गगनात मावेना.

एक चुणचुणीत मुलगा म्हणाला, आम्हाला साहित्य संमेलनात आमची कला सादर करायला मिळेल असे वाटले होते. पण आम्हाला आमंत्रणच आले नाही. पण आता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष स्वतः आम्हाला भेटायला आले आणि आम्हाला खूप आनंद झाला. आता त्यांच्यासमोर आम्ही आपली कला सादर करू. पण आमची एक अट आहे. आमचा कार्यक्रम आवडला तर पुलंनी आम्हाला पेटी वाजवून दाखवावी. पुलंनी अर्थातच त्यांची ही अट मान्य केली.

आणि नंतर घडले ते सगळे अद्भुत ! मुलांच्या कलागुणांवर पुलं अफाट भाळले. त्यांनी मुलांना मग पेटी तर वाजवून दाखवलीच, पण त्यांना जे जे हवे ते सगळे केले. एवढे करून पुलं थांबले नाहीत. त्यांनी त्या मुलांच्या कलागुणांचे कौतुक वर्तमानपत्रात लेख लिहून केले. शिवाय आपल्या पुढाकाराने त्या मुलांचा कार्यक्रम पुण्यात घडवून आणला. मुलं आणि पुलं यांची झकास गट्टी जमली. मुलांचे ते आवडते भाईकाका झाले. असे होते पुलं . जेवढे साहित्यिक म्हणून मोठे, तेवढेच माणूस म्हणूनही.

एकदा पुलंच्या वाढदिवसाच्या दिवशी एक पत्रकार त्यांची मुलाखत घ्यायला त्यांच्या घरी गेला. काही प्रश्न विचारल्यानंतर तुमच्या जीवनातील सर्वात आनंदाचा क्षण कोणता असे त्याने पुलंना विचारले. काही क्षण पुलं शांत होते. पत्रकाराला वाटले की बहुधा त्यांना काय सांगावे हा प्रश्न पडला असेल. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## वैराग्य निरूपण

**ज्योतिर्मय साहित्य**


मानवी जीवन खुप कमी आहे पण ते फार मोलाचे पण आहे. तेव्हा ऊगीच वेळ वाया घालवू नये. त्याचे सार्थक करून घ्यावे. हव्यास कवडीमोलाने जीवन जगून वाया घालवू नये. पुण्याईने नरदेह मिळाला तर मायेच्या पसाऱ्यात गुरफटून जाऊ नये. एक दिवस हात झाडून म्हणजे सगळे सोडून जायचे आहे. हे नेहमीच लक्षात ठेवावे.

वैराग्य निरूपणात आपण ५२ व्या ओवी पर्यन्त आलो होतो. सर्व समाजासाठी हा संदेश समर्थ देतात की पूर्वकर्माच्या ऋणानुबंधनातून प्रापंचातील प्रापंचातील गोळा होतात. आईबाप, भाऊबहीण, सर्व मित्रपरिवार, मुलेमुली, सगळे सगेसोयरे एवढंच काय तर प्रत्येक क्षणी आपल्याला चांगली माणसे भेटतात. पण आपले त्यांचे ऋणानुबंध जन्मोजन्मी असल्याने ते आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रापंचातील सुखदु:खाचे ते जन्मभर साक्षीदार असतात. पण सर्वच आपले आहेत असं म्हणून जर आपण वागलो तर ते पठतमूर्खचे लक्षण असेल. आपलं कोण परकं कोण हे समजत नाही आणि आपण ''हे विश्वची माझे घर'' असे म्हणून वागतो आणि याठिकाणी आपली फसगत होते.

एका भगवंता शिवाय आपले कोणी नसते. एका ईश्वरी सत्तेने विश्व चालते. तोच पाऊस पाडतो, समुद्राच्या मर्यादा तो नियंत्रित ठेवतो. समजा समुद्राने आपल्या मर्यादा सोडल्या तर सुनामी सारखी परिस्थिती निर्माण होऊन केवढा प्रलय निर्माण होतो हे आपण अनुभवले आहेच. त्सुनामी झाली तेव्हा किती लोकांचे प्राण गेले. तसेच वादळ, वारा, धरणीकंप, कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, हे सदैव चालूच असते.

शेष धरतीला आपल्या डोक्यावर तोलून धरतो म्हणून चंद्रसुर्य वेळेवर ऊगवतात. अशाप्रकारे भगवंताच्या सत्तेने सगळे चालते. अशा भगवंताला सतत स्मरावे. भोगाच्या किंवा इंद्रिय सुखाच्या मागे जाणारे हीन दुरात्मे समजावे. **(क्रमशः)**

## नामाकरताच नाम घ्यावे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

नाम हे निसरड्यासारखे आहे. निसरड्यावर गवत वाढत नाही आणि त्याच्यावर पाय पडला तर घसरतो त्याप्रमाणे नाम आपल्यावर उपाधी ठरू देत नाही. त्याला कोणत्याही उपकरणाची गरज लागत नाही. रोगी-निरोगी, विद्वान-अडाणी, श्रीमंत-गरीब, लहान-थोर, स्त्री-पुरूष, जात-गोत, यांपैकी कोणतीही गोष्ट असली तरी अडत नाही, नसली तरीही अडत नाही. नामाशिवाय दुसर्या कोणत्याही साधनाला शक्ती, बळ, पैसा वगैरे कोणत्या तरी गोष्टीची मदत लागते. असे हे अत्यंत उपाधिरहित असलेले नाम आपणही अत्यंत उपाधिरहित होऊन घेतले तरच त्यात आपल्याला प्रेम येईल. आपण उपाधिरहित होणे म्हणजे नाम हे केवळ नामाकरिताच, स्वत:च्या कल्याणाकरिताच घेणे, जगातल्या दुसर्या कशाहीकरिता न घेणे. आपण जर ते सकाम बुद्धीने घेतले तर इच्छित कार्यभागही साध्य होत नाही आणि आपले कल्याणही साधत नाही. सकाम नाम घेणे हे किती वाईट आहे हे सांगणे फार कठीण आहे. असे पहा की स्त्री ही अत्यंत पवित्र आहे, कारण देव, संत यांसारख्या विभूतिही तिच्यापोटी जन्म घेतात; अशा स्त्रियांना पळवून नेऊन अनीतीने वागायला भाग पाडून त्यावर पैसे मिळविण्याचा धंदा काही लोक करतात ही किती निंद्य गोष्ट आहे बरे ! पण सकाम नाम घेणे ही गोष्ट त्याच्याहीपेक्षा कितीतरी पटीने अधिक निंद्य आहे. म्हणून नाम हे नामाकरिताच घ्यावे, त्याचा संबंध आपल्या इच्छा-अपेक्षांशी ठेवू नये. नामाकरिता नाम घेतल्याने मन आपोआप अंतर्मुख होऊन जाते. नामाच्या साहाय्याने मन अंतर्मुख केल्यावर आनंद सापडतो. आपल्या हृदयातच तो सापडतो.

आपण तीन गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. पहिली, आचरण अगदी शुध्द ठेवावे; दुसरी, नामाला कधीही सोडू नये; आणि तिसरी, माझा सांभाळ करणारा कुणीतरी -म्हणजे सद्गुरू - आहे ही जाणीव जागृत ठेवावी. प्रत्येक माणसाला कशाचीतरी विशेष आवड असते; त्या आवडीमध्ये राहावे आणि त्यात जबरीने नाम घ्यावे. आत्मज्ञान व्हावे म्हणून त्याच्या मागे लागले तर ते लवकर होत नाही. भगवंताकडे लक्ष लागले म्हणजे ते आपोआप होते. भगवंताचे नाम घेणे हे ज्ञान होण्याचेच लक्षण आहे. उत्तम वस्तू नेहमी थोडीच असते. श्रीखंडामध्ये चक्का आणि साखर कितीतरी असते पण केशर किती थोडे घालावे लागते! तसे भगवंताच्या नामाचे आहे. रोज थोडे पण अगदी मनापासून आणि मोबदल्याची अपेक्षा न करता नाम घ्यावे ते फार काम करील. भगवंत हा सर्वसत्ताधीश खरा पण एका बाबतीत तो लुळापांगळा होतो व सहज अडकतो. भुंगा जसा लाकूड पोखरतो पण कमळांत अडकतो तीच स्थिती नामाच्या बाबतीत भगवंताची होते.

पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे तसे नाम हे मनाचे जीवन आहे.


***

## ॥ संत महात्म्य ॥

**लेखक - मधुकर बोरीकर**

**9403061886**

## संत श्री भानुदास महाराज



**ज्योतिर्मय साहित्य**

असे गुरु का करतील? त्यांची अनेक वर्षाची साधना ते आपल्यासारख्या अपात्र माणसावर का उधळतील? याचा आपण विचार करीत नाहीत. गुरु अशाच लोकांचा भोग त्यांच्या शक्ती द्वारे संपवतात की, ज्या साधकाची साधना प्रचंड आहे, त्यासाठीचे त्याचे प्रयत्न आटोकाठ आहेत, आणि तरीही तो कुठेतरी कमी पडतो आहे. केवळ अशा दुर्मिळ क्षणीच सद्गुरु त्याचे भोग आपल्या शक्तीने संपवितात पण या कामी त्यांचीही प्रचंड शक्ती खर्च होते.

जोवर आपले भोग, माग संपत नाहीत तोवर आपणास आत्मदर्शन होणे नाही. आणि भोग संपवण्याची जी दिशा आहे ती बाह्य जगताकडे नसून अंतर जगताकडे आहे, म्हणून तू मागे परतून पहा, म्हणजे आत्मज्ञानाकडे जाणाऱ्या रस्त्याकडे वळ, असे भानुदास महाराज सांगतात. विषया तून परमेश्वर प्राप्ति करताना माया रस्ता भटकविते आणि माणूस भरकटल्या जातो.परमात्मा हा मुळातच चैतन्यमय शुद्ध सात्विक आहे. त्याला विषयात हुडकणे हे व्यर्थ ठरणारे असते. पिंडी ते ब्रम्हांडी बोलता ती वेद होई तू सावध भुलू नको

शारीरिक रोग निवारण्यासाठी जसे शरीरशास्त्र किंवा आरोग्य शास्त्र सांगण्याची आवश्यकता नसते तर प्रत्यक्ष औषधोपचार करावा लागतो तसे संसार रोग नाशासाठी शास्त्र सांगून अनंत जन्मातही लवही लाभ होत नाही तर त्यासाठी रक्त मन बुद्धी अहंकार व प्राणांची कारण शरीरापर्यंत पंचकोश चिकित्सा करावी लागते ही चिकित्सा सांगणारे जे शास्त्र आहे त्याला योगशास्त्र हे नाव आहे या योगशास्त्राप्रमाणे ब्रम्हांडात जे जे घटक आहेत ते ते सर्व घटक आपल्या पिंडात सुद्धा आहेत म्हणून या पिंडातील घटक म्हणजे प्राण मन बुद्धी व अहंकार यांना कुशलतेने प्रवृत्तीतून निवृत्ती मार्गाकडे वळवणे व त्याच मार्गाने आत्मविकास होणे हे गरजेचे असते. हा योग साधण्यासाठी ब्रम्हांडात जी पाच तत्वे आहेत तीच पाच तत्त्वे म्हणजे पृथ्वी आप वायू तेज व अग्नी ही आपल्या पिंडातही उपलब्ध असतात ब्रम्हांडात जशी प्रलयाच्या वेळी एक तत्त्व दुसऱ्यात मिसळून त्याचा विलय होतो त्याचप्रमाणे पिंडातही या तत्त्वांचा क्रमाने विलय करावा लागतो. यालाच पंच देहाची आटणी असे म्हणतात.

**(क्रमशः)**



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**वने रणे शत्रुजलाग्निमध्ये महार्णवे पर्वतमस्तके वा।**

**सुप्तं प्रमत्तं विषमस्थितं वा रक्षन्ति पुण्यानि पुरा कृतानि ।।**

अर्थ - वनात, रणात, शत्रुजनांमध्ये, पाण्यात, अग्नीत, महासागरात, पर्वत शिखरावर तसेच निद्रिस्त, उन्मत्त, आपद्ग्रस्त माणसाचे संरक्षण पूर्वी केलेली पुण्येच करत असतात.

कर्मांमुळे तयार झालेले त्याचे अंती संचितच परीणामकारक ठरते, असे प्रतिपादन येथे कविराज भर्तृहरींनी केले आहे.

**गुणवदगुणवद्वा कुर्वता कार्यजातं परिणतिरवधार्या यत्नत: पण्डितेन।**

**अतिरभसकृतानां कर्मणामाविपत्तेर् भवति हृदयदाही शल्यतुल्यो विपाकः ।।**

अर्थ - गुणयुक्त आणि दोषयुक्त कर्म करताना विद्वानांनी त्याचे परिणाम योग्यप्रकारे जाणून घ्यावेत. अतिशय त्वरेने केल्या गेलेल्या कर्मांचा परिणाम आजीवन हृदयास शल्याप्रमाणे जाळणारा असतो.

कोणतेही कर्म करताना ते सारासार विचार करून केले जावे, असे या श्लोकाद्वारे कविराज भर्तृहरींनी सांगीतले आहे.




## कमी रक्तदाबावर घरगुती उपाय

**ज्योतिर्मय साहित्य**

५० ग्रॅम देशी हरभरा आणि १० ग्रॅम बेदाणे १०० ग्रॅम पाण्यात मिसळून रात्री कोणत्याही काचेच्या भांड्यात ठेवा. सकाळी बेदाणासोबत हरभरे चावून खावे आणि पाणी प्यावे. जर देशी हरभरा उपलब्ध नसेल तर फक्त मनुका घ्या. या पद्धतीसह, रक्तदाब काही आठवड्यांत सामान्य केला जाऊ शकतो.

३-४ बदाम रात्री पाण्यात भिजत ठेवा आणि सकाळी काढा आणि त्यात १५ ग्रॅम बटर आणि खडीसाखर मिसळून बदाम खाल्ल्यास कमी रक्तदाब सामान्य होतो.

हिरवी फळे किंवा आवळ्याचा मुरंबा रोज खाणे कमी दाबामध्ये खूप उपयुक्त आहे.

२ ग्रॅम करवंदाच्या रसामध्ये १० ग्रॅम मध मिसळून काही दिवस सकाळी घेतल्यास कमी रक्तदाब सामान्य होण्यास मदत होते.

कमी रक्तदाब सामान्य राखण्यासाठी बीटचा रस खूप प्रभावी आहे. हा रस रोज सकाळी आणि संध्याकाळी प्या. यामुळे तुम्ही एका आठवड्यात तुमचा कमी रक्तदाब सुधारण्यास सक्षम व्हाल.

जटामांसी, भिमसेन कापूर आणि दालचिनी समप्रमाणात घेऊन मिश्रण तयार करून प्रत्येकी तीन ग्रॅम सकाळ संध्याकाळ कोमट पाण्यासोबत घ्यावे. तुमचा कमी रक्तदाब काही दिवसात सुधारेल.

जर एखाद्याला कमी रक्तदाबाची तक्रार असेल आणि वारंवार चक्कर येत असेल तर आवळ्याचा रस मधात मिसळून चाटल्याने लवकर आराम मिळतो.

२-३ सुक्या खजूर रात्री दुधात उकळून प्यायल्यास किंवा खजूर खाल्ल्यानंतर दूध प्यायल्याने कमी रक्तदाब सामान्य होतो. आल्याच्या बारीक चिरलेल्या तुकड्यांमध्ये लिंबाचा रस आणि खडे मीठ एकत्र करून ठेवा. दिवसातून अनेक वेळा थोड्या प्रमाणात जेवणापूर्वी खाल्ल्याने कमी रक्तदाबाचा आजार बरा होतो.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

२०० ग्रॅम दह्यात सैंधव मीठ, भाजलेले जिरे आणि थोडी भाजलेली हिंग मिसळून रोज प्यायल्यास या समस्येचे निराकरण होण्यास खूप मदत होते.

२०० ग्रॅम टोमॅटोच्या रसात थोडी काळी मिरी आणि मीठ मिसळून प्यायल्याने फायदा होतो.

उच्च रक्तदाबामध्ये जिथे मिठाच्या सेवनाने रुग्णाचे नुकसान होते, तिथे कमी रक्तदाबाच्या रुग्णांना मिठाच्या सेवनाने फायदा होतो. त्यामुळे रोज सकाळी कोमट पाण्यात चिमटभर सैंधव मीठ टाकून प्यावे.

५० ग्रॅम पालकाचा रस, २०० ग्रॅम गाजराच्या रसात मिसळून पिणेही कमी रक्तदाबाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरते.

दररोज लिंबू पाण्यासोबत किंवा कोशिंबीर इत्यादी सोबत खाल्ल्यास या त्रासापासून दूर होते.

लो ब्लडप्रेशरच्या रुग्णांसाठी लसूण खूप फायदेशीर आहे, त्याचे नियमित सेवन केल्याने कमी रक्तदाबाच्या समस्येत आराम मिळतो.

यासोबतच कमी रक्तदाबाच्या रुग्णांसाठी आहारात पोषक तत्वांचा समावेश असावा, चालणे, सायकलिंग, पोहणे यासारखे व्यायामही फायदेशीर ठरतात.





**ज्योतिर्मय साहित्य**


खरे वैराग्य संतांजवळ असते कारण ते विवेकातून आलेले असते. स्माशनातून येताना वैराग्य येते.मैथुन नंतर ही ते येते. हे क्षण भंगूर असते. ज्यावेळी अंत:करण मन बुद्धी ढळते त्या वेळी हे विचार वैराग्य आठवायला हवे. उत्तम वैराग्य विवेकातून येते.विवेक संतांजवळ असते.

चंद्र तेथे चंद्रिका, शंभू तेथे अंबिका.. यातही हे स्पष्ट होते. मनाच्या उपशमाचा विचार वशिष्ठानी सांगितला. मनाला देवाचा चरणी समर्पित करणे. त्यास आवरता यायला हवे. आपले मन कोठे धावू नये, मन स्थिर असावे या मनोनाश करणे गरजेचे असते..सरूप, अरूप मनोनाश असे दोन प्रकार आहेत.मनाला शांत,निश्पंद करायचे तर ज्ञानाने, संत संगती,योग,प्राणायाम या द्वारे करावे.माणसाचे जीवनाचे अधिष्ठान हे विचाराचे आहे. रणांगणात गीतेचा उपदेश देताना कृष्ण व अर्जुन हे कसे होते तर अस्थिर मनाचा कृष्ण म्हणजे अर्जुन, आणि स्थिर मनाचा अर्जुन म्हणजे कृष्ण. या दोघात देहाच्या शिवाय अन्य फारसा फरक नव्हताच. मनाच्या बोधा साठी संत वांगमय असते. विश्वामित्र सोबत राम व लक्ष्मण सोबत गेली. विश्वामित्रांनी रामास अनेक अस्त्रे दिली,शस्त्रे दिली जी भगवान शंकराकडून मिळविली होती. अस्त्रे मंत्र सामर्थ्यावर अवलंबून होते. विश्वामित्रांनी रामचंद्र प्रभूला ज्ञानसंपन्न केले. वसिष्ठानी प्रभु रामास ज्ञान दिले तर विश्वामित्रांनी त्यांना कर्माचे अधिष्ठान दिले. कर्माला निर्दोष ज्ञानाचे डोळे हवेत. ज्ञान आंधळे व कर्म दूषित हे उपयुक्त नाही. दोन्हीं असावेत. जीवनाची धन्यता ज्ञानाने होतेच, पण कर्मनिष्ठता नसेल तर जीवन निरर्थक होईल. **(क्रमशः)**

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**


रवींद्रनाथ हे सौंदर्यपूजक होते. त्यामुळे आपल्या नाटकांमध्ये त्यांनी जीवनातील सौंदर्य दाखवण्याबरोबरच जीवनातील कुरूपतेवरही प्रहार केले आहेत. त्यांच्या नाटकांमध्ये मुक्तीचाही विचार आपल्याला आढळतो. पण त्यांना अभिप्रेत असलेली मुक्ती म्हणजे जीवनापासून पळून जाणे नसून जीवन अधिक चांगल्या प्रकारे जगण्यासाठी येणाऱ्या समस्या, अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरा यावर मात करून प्रगतीकडे वाटचाल करणे असा आहे. माणूस निसर्गाशी एकरूप झाला तरच तो सुखी होईल अशी त्यांची भावना होती. त्यांचे सर्व साहित्य याच उदात्त भावनेचा उद्घोष करते.

भारतीय संगीताला अत्यंत प्राचीन असा वारसा लाभलेला असून भारतीय संगीत परंपरा ही हजारो वर्षांपूर्वीची समृद्ध अशी परंपरा आहे. आपले वेद आणि उपनिषदे हे सूर आणि तालाच्या माध्यमातूनच पुढच्या पिढीपर्यंत पोहोचले. तत्त्वज्ञानासारख्या रुक्ष विषयांना देखील वेदातील गेयतेमुळे सौंदर्य प्राप्त झाले. ताल आणि सुरांमुळे निर्जीव अक्षरांना मंत्रांचे सामर्थ्य प्राप्त झाले. त्यातूनच भारतीय संगीत परंपरेचा उदय झाला.

भारतीय संगीताने जात-पात किंवा इतर कोणतेही भेद बाळगले नाहीत. ते भारतीय समाजाशी एकरूप झाले होते. पण ज्याप्रमाणे पारतंत्र्यांमध्ये भारतीय कला, साहित्य, नाटक, नृत्य, शिल्प इत्यादी कलांना घरघर लागली होती, तशाच प्रकारची अवस्था संगीतालाही प्राप्त झाली होती. वाहत्या पाण्याचा ओघ अचानक थांबावा आणि त्याला एखाद्या डबक्याचे स्वरूप प्राप्त व्हावे तशाच प्रकारची अवस्था भारतीय पारंपरिक संगीताची झाली होती. रवींद्रनाथांनी ज्याप्रमाणे भारतीय नाट्यपरंपरेचे पुनरुज्जीवन केले, तशाच प्रकारचे पुनरुजीवन भारतीय संगीत परंपरेचे त्यांनी केले. संगीताची परिभाषाच त्यांनी बदलून टाकली आणि रवींद्रसंगीताचा जन्म झाला. रवींद्रनाथ ज्या कुटुंबात वाढले त्या कुटुंबामध्ये कला, क्रीडा, साहित्य, संगीत, तत्त्वज्ञान आदींचा समृद्ध वारसा होता. भारतीय परंपरेतील एखादी गोष्ट जुनी झाली म्हणून ती टाकाऊ आहे किंवा पाश्चात्य जगतातील सर्वच गोष्टी चांगल्या आहेत अशा प्रकारची टोकाची भूमिका त्यांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची कधीच नव्हती. चांगल्या गोष्टींचा स्वीकार त्यांनी नेहमीच केला. मग ती पौर्वात्य असो वा पाश्चिमात्य. त्यांच्या घरात साहित्यासोबतच गायन कलेची आराधना होत होती. त्यांचे वडील बंधू ज्योतिरिंद्रनाथ यांना गायनाची अतिशय आवड होती. पाश्चिमात्य संगीताचाही त्यांचा अभ्यास होता. मोठमोठे गायक आणि संगीतकार त्यांच्या जोराशंको वाड्यात आपली कला सादर करण्यासाठी हजेरी लावीत. लहानपणापासूनच रवींद्रनाथांना संगीताची देखील आवड असल्याने त्यांच्या घरातील या वातावरणामुळे त्यांचा संगीताचा कान आपोआपच तयार झाला. एक दृष्टी प्राप्त झाली. त्यातूनच ते कविता लिहू लागले, गीत रचना करू लागले.

# खगोलशास्त्र आणि विज्ञान साहित्य क्षेत्रातले उत्तुंग व्यक्तिमत्त्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर

**ज्योतिर्मय साहित्य**



जागतिक कीर्तीचे महान गणिती, खगोलशास्त्रज्ञ आणि विज्ञान कथालेखक, पद्म विभूषण डॉ .जयंत विष्णू नारळीकर यांनी २० मे २०२५ च्या पहाटे निद्रावस्थेत असतानाच अखेरचा श्वास घेतला आणि अनंताकडे प्रस्थान केले.

डॉ. नारळीकर यांच्याशी माझा परिचय, मी कलकत्यात असताना १९८३ साली झाला होता . त्यावेळी ते कलकत्यातल्या गोलपार्क येथील रामकृष्ण मिशनच्या भव्य सभागृहात संपन्न होत असलेल्या चर्चासत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून कलकत्यात आलेले होते. त्यांचे समारोपाचे भाषण संपताच मी त्यांना भेटलो होतो आणि नुकतेच प्रकाशित झालेले माझे मुंबई - रोम - मुंबई मोटरसायकल प्रवासाचे पुस्तक, अष्टचक्री रोमायण त्यांच्या हातात सुपूर्द केले होते. दुसऱ्याच दिवशी सकाळी ते विमानाने मुंबईला परतत असताना त्यांनी ते माझे पुस्तक विमानातच बसल्याबसल्या वाचून काढले होते आणि घरी परतताच मला त्वरेने स्वहस्ते पत्र लिहून आपला छानसा अभिप्राय कळवला होता. त्यानंतर माझा मुक्काम कलकत्यात असतानाच, १९८५ सालचा ''रथीन्द्रनाथ टागोर पुरस्कार '' हा डॉ .जयंत नारळीकर यांना दिला जाणार असल्याचे मला कळताच मीच त्यांना ती आनंदवार्ता सर्वप्रथम पत्राने कळवली होती. रथीन्द्रनाथ हे रवीन्द्रनाथ टागोर यांचे सुपुत्र आणि शांतिनिकेतनच्या विश्वभारती विद्यापीठाचे पहिले उपकुलगुरू होते. त्यांच्या नावाने प्रतिवर्षी दिला जात असलेला हा पुरस्कार राष्ट्रीय दर्जाचा आणि अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार मानला जातो. त्याहीवेळी डॉक्टर जयंत नारळीकर यांचे मला त्यांच्याच हस्ताक्षरात छानसे पत्र आले होते. त्यांची ती दोन्ही पत्रे मोलाचा ठेवा समजून मी आजपर्यंत जपून ठेवली आहेत .

त्यानंतर कितीतरी वर्षांनी, २०१७ सालच्या जानेवारीत, साहित्य अकादमीच्या मुंबई शाखेच्या सभागृहात आयोजित ''लेखक आपल्या भेटीला'' या उपक्रमात मला त्यांचे विचार ऐकायला मिळाले होते. त्यावेळी ते म्हणाले होते, सुबोध भाषेत सुरस विज्ञान-कथा निर्माण होणे ही काळाची गरज आहे. लालित्यपूर्ण लेखनाची कला ज्यांना अवगत झाली आहे त्यांनी विज्ञान-कथा लिहाव्यात, जेणेकरून सर्वसामान्य वाचकांना विज्ञानाची ओळख सहजपणे होईल. विज्ञान-कथा या साहित्यप्रकाराला नियतकालिकांच्या संपादकांच्या लेखी फारशी मान्यता असल्याचे चित्र आज दिसत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातही विज्ञान-कथाकारांना यथायोग्य व्यासपीठ दिले जात नाही. वास्तविक, विज्ञान-कथा हे देखील अस्सल साहित्याचेच एक महत्वाचे अंग आहे. विज्ञान साहित्य हे रंजक आणि प्रबोधनात्मक या दोन्ही प्रकारचे असू शकते. त्यामुळे साहित्य-संमेलनाच्या मंडपात विज्ञान-कथाकारांना दुय्यम दर्जाची वागणूक न देता, त्यांचा योग्य सन्मान व्हायला हवा आणि त्यांना संमेलनांच्या उपद्वारातून नव्हे तर मुख्य-द्वारातून प्रवेश मिळाला पाहिजे '' असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले होते.

आपल्यातील लेखक कसा जागा झाला याबद्दल सांगत असताना त्यांनी आपल्या बालपणाच्या बनारसमधल्या अनेक आठवणींना उजाळा दिला होता. नाथमाधव यांना ''वीरधवल'' या कादंबरीचे कथानक, ज्या मूळ इंग्रजी कादंबरीवरून सुचले होते त्या इंग्रजी कादंबरीचा शोध नारळीकरांनी प्रत्यक्ष इंग्लंड - अमेरिका या देशातल्या मोठमोठ्या ग्रंथालयात जाऊन घेतला होता जो विफल ठरला होता. सरतेशेवटी ती कादंबरी त्यांना आपल्या मुंबई-विद्यापीठाच्या ग्रंथालयातच मात्र जीर्ण - शीर्ण अवस्थेत कशी सापडली होती, त्याबाबतची सुरस कथा त्यांनी अगदी विनोदी पद्धतीने तेव्हा सांगितली होती. जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ म्हणून ते ओळखले जाऊ लागल्यानंतरच्या काळात, एके दिवशी त्यांनी आपली एक विज्ञान-कथा कुठल्याश्या स्पर्धेसाठी पाठवली तेव्हा आपल्या नावाच्या दबदब्यामुळे परीक्षकांवर उगाच दडपण यायला नको, त्याशिवाय आपल्या कथालेखनाचा खरा दर्जा काय आहे हेही आपल्याला समजून यावे या उद्देशाने त्यांनी जयंत विष्णू नारळीकर या आपल्या नावाऐवजी, नारायण विनायक जगताप या काल्पनिक नावाने ती कथा स्पर्धे साठी पाठवून दिली होती. तरीही त्याच कथेला जेव्हा प्रथम क्रमांक घोषित झाला, तेव्हा मात्र त्यांनी गौप्यस्फोट केला होता आणि आपणच त्या कथेचे जनक आहोत हे उघड केले होते. वैज्ञानिक हे केवळ दुर्बोध लेखन करतात असे मुळीच नाही. तसेच ललित लेखन करण्यात वाकबगार असलेल्या वैज्ञानिकांचे सगळेच लेखन हे सुबोध आणि

प्रवीण कारखानीस

लालित्यपूर्ण असतेच असेही नाही, हे स्पष्ट करताना डॉ. नारळीकर यांनी एक गंमतीदार किस्सा सांगितला होता. लुई कॅरॉल या इंग्रजी लेखकाचे ॲलीस इन वंडरलॅन्ड हे अतिशय रंजक, सुरस पुस्तक इंग्रजी भाषेतल्या बालसाहित्यातला मोठा ठेवा आहे परंतु ते पुस्तक आपल्या बालपणी वाचल्यावर इंग्लंडची व्हिक्टोरिया राणी या लेखकाच्या लेखनावर फिदा झाली होती की तिने उत्साहाच्या भरात त्या लेखकाची सगळी पुस्तके मागवून घेतली होती. तिला बिचारीला हे ठाऊक नव्हते की लुई कॅरॉल हा एक महान गणिती होता आणि तिने मागवलेली त्याची इतर सगळीच पुस्तके ही अंकगणित ,बीजगणित आणि भूमिती या विषयांवरची होती ! असे अनेक गमतीदार किस्से मला त्या कार्यक्रमात डॉक्टरसाहेबांकडून ऐकायला मिळाले होते. अलीकडच्या काळातल्या मंगळावरील मोहिमांबद्दलच्या एका प्रश्नाला अत्यंत तर्कशुद्ध आणि परखड उत्तर देताना डॉ. नारळीकर म्हणाले होते की कोणत्याही ग्रहावर माणसाला जिवंत राहण्यासाठी अनुकूल असे वातावरण आणि तापमान जोवर आढळत नाही किंवा तसे ते कृत्रिमरीत्या त्या ग्रहांवर तयार होत नाही, तोवर अश्या ग्रहांवर जाऊन वस्ती करण्याचे माणसांचे मनसुबे सत्यात उतरणे हे अशक्य नसले तरी अवघड निश्चित आहे. असेही ते म्हणाले.

डॉ. जयंत नारळीकर यांना गणिताचे बाळकडू त्यांच्या वडिलांकडून मिळाले होते .त्यांचे वडील, विष्णु वासुदेव नारळीकर हे केंब्रिज विद्यापीठातून गणितं विषयात पदवी मिळवलेले आणि गणितातले रँगलर होते. त्यांच्या मातोश्री सुमतीबाई या संस्कृतच्या विदुषी होत्या. संख्याशास्त्र या विषयातले गाढे विद्वान, केंब्रिज विद्यापीठाने गौरवलेले वसंत शंकर हुजूरबाजार यांच्या त्या भगिनी होत्या. अश्या असामान्य मातापित्यांच्या पोटी जयंत नारळीकर हे १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापुरात जन्मले होते. त्यांचे वडील हे बनारस हिंदू विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक असल्याने जयंतराव यांचे शिक्षण बनारसला झाले. बी.एस्सी. पदवी परीक्षेत ते विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले. टाटा एन्डोव्हमेन्ट स्कॉलरशिप मिळाल्याने ते उच्च शिक्षणासाठी केम्ब्रिजला गेले. केम्ब्रिज विद्यापीठात सुवर्ण पदक मिळवून ते बी.ए. झाले आणि खगोलशास्त्राचे स्मिथ सुवर्ण पारितोषक मिळवून ते एम.ए .झाले. पुढे आपल्या वडिलांप्रमाणे तेही गणितातले रँग्लर झाले. केम्ब्रिज विद्यापीठाचे प्रोफेसर फ्रेड हॉइल यांच्यासोबत १९६६ साली त्यांनी गणित शास्त्राच्या आधाराने गुरुत्वाकर्षणासंबंधी केलेल्या मौलिक शास्त्रीय संशोधनाचे आणि मांडलेल्या सिद्धांतांचे जगभर कौतुक झाले आणि जयंतराव प्रसिद्धीच्या झोतात आले. मुंबईच्या टाटा इंस्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्च मध्ये त्यांनी काही वर्षे अध्यापन केले . '' पद्मभूषण '' हा सन्मान त्यांना प्राप्त झाला तेव्हा ते अवघ्या सत्तावीस वर्षांचे होते. कालांतराने त्यांचा गौरव '' पद्म विभूषण '' हा पुरस्कार देऊन करण्यात आला. महाराष्ट्र शासनाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार आणि अमेरिकेतल्या महाराष्ट्र फाऊन्डेशनचा जीवन गौरव पुरस्कार त्यांना देण्यात आला.

त्यांच्या सुविद्य पत्नी, मंगला नारळीकर (लग्नापूर्वीच्या, मंगला सदाशिव राजवाडे ) याही गणित विषयात डॉक्टरेट मिळवलेल्या विदुषी होत्या. अनेक वर्षे त्या मुंबई आणि पुणे विद्यापीठात गणित विषयाच्या प्राध्यापिका होत्या. मुंबईच्या टाटा मूलभूत संशोधन केंद्रात त्या काही वर्षे कार्यरत होत्या . त्याही उत्तम लेखिका होत्या. गणिताशी गप्पा, गणिताशी मैत्री या शीर्षकाची पुस्तके त्यांनी गणिताबद्दल लहानमुलांना वाटणारी भीती घालवण्यासाठी आणि गणिताबद्दल त्यांच्या मनात गोडी निर्माण करण्यासाठी लिहिली. विविध देशांतल्या निरीक्षणावर आधारित त्यांचे पुस्तक, ''पाहिलेले देश , भेटलेली माणसे '' अतिशय रंजक आणि माहितीपूर्ण आहे. अलीकडेच, १७ जुलै २०२३ रोजी त्या निवर्तल्या. या नारळीकर दाम्पत्याला गीता. गिरीजा आणि लीलावती अश्या तीन कन्या आहेत .

डॉ. जयंत नारळीकर यांची ग्रंथनिर्मिती थक्क करणारी आहे अभयारण्य, अंतराळातील भस्मासूर, टाईम मशीनची किमया, व्हायरस, सूर्याचा प्रकोप, यक्षांची देणगी आकाशाशी जडले नाते, नभात हसरे तारे, वामन परत न आला, यासारखे त्यांचे अनेक विज्ञान कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. पुण्यातल्या इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स अर्थात ''आयुका'' या संस्थेचे ते संस्थापक आणि तहहयात निदेशक होते. पद्म विभूषण आणि महाराष्ट्र -भूषण या सन्मानाने ते गौरवान्वित झाले होते. ''चार नगरातले माझे विश्व '' या त्यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकाला २०१५ साली साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला होता. नाशिकमध्ये मार्च २०२१ मध्ये झालेल्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांनाच मिळाला होता मात्र प्रकृति अस्वास्थ्यामुळे ते संमेलनास उपस्थित नव्हते.

डॉ .जयंत नारळीकर यांच्या निधनाने खगोलशास्त्र आणि विज्ञान साहित्य या क्षेत्रातला एक आधारवडच उन्मळून पडला आहे ! त्यांच्या स्मृतीस शतशः प्रणाम !

# इंदापूरी निखारे



## शुभमंगल.....




**ज्योतिर्मय साहित्य**

एखादी घटना घडते आणि मग मीडियावर, फेसबुक वर, व्हाट्सअप वर धुमाकूळ घालते. त्या घटनेच्या निमित्ताने अनेक उपकथा लिहिल्या जातात आणि मस्त मनोरंजन होते ! आजकाल कितीही धक्कादायक घटना असली तरी ती मनोरंजन व्हायला पाहिजे त्या पेक्षा व्हायरल झाली पाहिजे असे वाटत असते. असो!

त्याची मुलगी मस्त शिकली, चांगली नोकरी करत होती आणि आईवडील आपण निवृत्त होण्याच्या आत मुलीचे लग्न करून टाकू म्हणजे आपली जबाबदारी संपली अशा विचारात असायचे. मग जी काय धावपळ करायची असते ती करून तिचे लग्न ठरवतात. एखादे असे कार्य ठरले की उगीचच अनेक सल्ले देणारे त्याचे अतिशय बहुमूल्य सल्ले देण्यासाठी तत्पर असतात, त्यापेक्षा जास्त हे दाखवून देत असतात की मी किती योग्य व्यक्ती आहे, कार्य सिद्धीस नेण्यासाठी ! चुकून कोणा दुसऱ्याचे नाव घेतले तरी अगदी हसत खेळत तो किती फालतू आहे हे अनेक पुराव्यानिशी दाखवून देतात. ट्रकभर पुरावे आहेत असे तो म्हणायच्या आतच म्हणतात, अहो तुम्हालाच सगळे करायचे!मंगल वातावरणात तरी द्वेष, मत्सर नको गुरुदेव!एकदा फक्त बायकोला सांगतो की झालं! अहो बोलवा त्यांना लगेचच, तुमच्यापेक्षा त्यांना समजेल सगळ्या विधीचे आणि कुलदैवत साठी काय पूजा पाठ करायचे ते ठरवतो...

तर घरी लग्न कोणाचे ठरले की जी काही गडबड घरात सुरु होते ती सुरु झालेली. खरंच लग्न सोहळा निमित्त होणारी जी धावपळ असते ती मनाला आयुष्यभर मनस्वी आनंद देणारी असते. जुन्या काळजात रुतून बसलेल्या अनेक आठवणींना उजाळा मिळतो. त्या आठवणी बदलत गेलेल्या काळानुसार बदलेल्या रूपात समोर येतात आणि प्रचंड ऊर्जा देतात उर्वरित आयुष्यभरासाठी...

आजकाल खूप बदल होत चालला आहे. लग्न हा संस्कार, संस्कृती आहे हा विचार नाहीसा होत आहे आणि एक इव्हेंट अशा स्वरूपात सादर करण्यात येतो! असो, कालाय तस्माय नमः! असा उत्तम वाक्प्रचार मदतीला कायमस्वरूपी युगानुयुगे आहे...

तर लग्न महिन्यावर, सगळी व्यवस्था, पाहुणे, रहाणे कार्यालय आणि कार्यक्रम वगैरे वगैरे सर्व तयारी. सगळी तयारी झालेली मग एक दिवस लग्नाच्या आधी भेटू असे फोनवर बोलून ठरवले जाते. भेटतात, बोलतात दोघांचे आईवडील म्हणतात, आश्वासन देतात थोडंफार काही राहून गेले तरी नंतर पूर्तता करू ! तरी काही राहिले असेल तर बोलू या...

त्याची आई सुनेला विचारते, माझ्याकडून काही स्पेशल गिफ्ट पाहिजे का? का मी देणार ती आवडेल? ती म्हणते तुम्ही जे द्याल ते, पण सासूबाई माझ्याकडून काही स्पेशल? जावईबापू तुम्हाला काही विशेष गिफ्ट? नको नकोच बाबा. बाबा आईकडे बघत म्हणतात फक्त एक खरेदी राहिली आहे ती म्हणजे हिच्यासाठी नवीन मोबाईल...

जावईबापू म्हणतात...

खरं तर मीच दिला असता मोबाईल... पण आता देता येणार नाही... आणि दिला तरी कोणाला सांगता येणार नाही... सगळे मनसोक्त हसायला लागतात ! इतका वेळ मुखवटा धारण करून बोलणारे या एका वाक्याने कुटुंब होऊन गेले! एक विश्वास न ळत सर्वांच्या चेहऱ्यावर अगदी आनंदाने ओसंडून जाणारा!एक अलिखित नियम होऊन गेला... जावयाने सासूबाईना मोबाईल द्यायचा नाही... आणि सासूबाईनी घ्यायचा नाही...

एका घटनेमुळे हा अलिखित नियम झाला... कळलेच नाही!!!



## जात्यावरच्या ओव्या......

बहिण भावंडाचा
काय विचार पांगला
भाऊ विचारे बाईला
माढी बांधू का बंगला ||८७||

दादा खातो पान
खातो आजारी बाजारी (कधीतरी)
लवंग सुपारी चे झाड
याच्या माढीच्या शेजारी ||८८||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## फुलमाला....



### बुचाची फुले....

शुभ्र सुरेख दिसती पाच पाकळ्यांची फुले बूचाची
वाऱ्याची झुळूक येता उधळण होते सुगंधाची

झाडाची साल सहज निघते त्या पासुनी करती बुचे तयार
या फुलांचे घोस लटकती वर्षातून यांचा दोनदा बहार

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज.







# मराठी माझी मातृभाषा

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी जगातील संपूर्ण ज्ञान मातृभाषेत उपलब्ध करण्यासाठी साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही जेवढी मराठी माणसांसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे तेवढीच आपणा सर्व मराठी बांधवांची जबाबदारी ही वाढली आहे. १८५७ च्या बंडाचे गोडसे भटजींचे ‘माझा प्रवास’ हे त्या वेळच्या मध्य प्रदेशातील आठवणींचे पुस्तक हे आपल्याला मातृभाषा किती महत्वाची आपल्यासाठी आणि पुढील पिढींसाठी आहे याचे महत्त्व अधोरेखित करते. कमीतकमी दोन हजार पूर्वीची ही आपली मराठी भाषा जगभर पोहोचण्यासाठी आपणाला दक्षिण कोरिया, जपान, चीन या देशांनी जशा त्यांच्या त्यांच्या मातृभाषेसाठी धोरण अवलंबिले ते आपण करणेही गरजेचे आहे. भाषिक पुनरुज्जीवन ज्या पद्धतीने त्यांनी केले तशा पद्धतीचा मार्ग महाराष्ट्रातील मराठी भाषेसाठी वापरायला हवा.

दक्षिण कोरिया, जपान, आणि चीन या देशांनी आपल्या भाषांचा वापर करून जागतिक स्तरावर प्रगती साधली आहे. मातृभाषेचे महत्त्व प्रगतीसाठी किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी सिध्द केले आहे.त्यांच्या भाषिक धोरणांमुळे त्यांनी तंत्रज्ञान, शिक्षण आणि आर्थिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय यश संपादन केले. दक्षिण कोरिया या देशाने भाषिक आत्मनिर्भरतेचा आदर्श सर्वांपुढे ठेवला आहे. १९४५ मध्ये दक्षिण कोरियाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात इंग्रजीचा प्रभाव कमी केला. त्यांनी कोरियन भाषेची ‘हंगुल’ यावर आधारित शिक्षण प्रणाली उभी केली. १९६०-७० च्या दशकात त्यांनी विज्ञान, गणित, तंत्रज्ञान यासारख्या विषयांची पुस्तके कोरियन भाषेत अनुवादित केली. त्यामुळे कोरियातील विद्यार्थी त्यांच्या कोरियन भाषेतून शिक्षण शिकू लागले. ज्यामुळे मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने त्यांच्या प्रतिभेला वाव मिळून कोरिया मधील विद्यार्थी जागतिक स्तरावर तांत्रिक आणि शैक्षणिक क्षेत्रात पुढे आले. सॅमसंग, एल जी ह्युंदाई यासारख्या कंपन्यांची स्थापना जवळपास ६ कोटी लोकसंख्या असलेल्या या देशात होऊन जागतिक बाजारपेठेत या कंपन्यांच्या उत्पादनांची यशस्वी घोडदौड सुरू झाली. मातृभाषेत विज्ञान, तंत्रज्ञान सर्वांपर्यंत पोहोचल्याने त्यांच्या प्रतिभेला उत्तुंग भरारी मारता आली,ज्याचा उपयोग त्यांनी तंत्रज्ञान विकसीत करीत जगाला अचंबित व्हावे असे उत्पादन विकसीत केले.

जपान देशाने तर दुसऱ्या महायुद्धानंतर बेचिराख झालेला आपला देश भाषेच्या उन्नतीतून विकसित केला. जपानने व्दितीय महायुद्धानंतर शैक्षणिक धोरणामध्ये जपानी भाषेला प्राथमिकता दिली. विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीचे शिक्षण जपानी भाषेतून दिले. १९७०-८० च्या दशकात त्यांनी तंत्रज्ञानात जगात आघाडी घेतली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मातृभाषेतून तंत्रज्ञान शिकल्याने त्यांच्या अविष्कारक्षमतेत विकास झाला. सोनी, दोयो, टोयोटा, होंडा यासारख्या कंपन्या जपानी ज्ञानभाषेच्या बळावर जागतिक ब्रँड बनल्या. भारतामधील विद्यार्थी जपानमध्ये शिक्षणासाठी जाण्याआधी जपानी भाषा अवगत करतात. जपानमध्ये शिक्षण आणि रोजगाराच्या संधीसाठी जाण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड चढाओढ आहे. चीन देशाने सुद्धा आपल्या मँडरिन भाषेतून १९५० ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षण प्रणाली विकसित केली. चीनने परदेशी भाषांचा प्रभाव कमी केला आणि मँडरिन भाषेतून विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन यासाठी अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला. त्यामुळे मँडरिन भाषेतून शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना सोपे जाऊन त्यांच्या प्रतिभेला वाव मिळाला. चीन देशाने त्यांच्या विद्यापीठांमध्ये तंत्रज्ञान अभ्यासक्रम,गणित आणि औद्योगिक शास्त्र मँडरिन भाषेमध्ये शिकवायला सुरवात केली. याचा परिणाम म्हणजे २००० ते २०२० या कालावधीत चीन देश तंत्रज्ञानातील देशांमध्यचे अग्रस्थानी पोहोचला. हुआवेई शाओमी, लेनोवो या कंपन्यांनी जागतिक बाजारपेठेत स्वतःच स्थान निर्माण केले




आहे. कोरिया, जपान आणि चीनने आपल्या मातृभाषांच्या माध्यमातून तंत्रज्ञान आणि शिक्षणात जागतिक प्रगती साधली.

रविंद्रनाथ टागोर यांचं म्हणणं असं होतं की, भारतातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील अभ्यासक्रम इंग्लंडमधील शाळांच्या धर्तीवर आखला आहे. त्याचा भारतीय परिस्थितीशी दुरान्वयानेही संबंध नाही. रवींद्रनाथ १९ व्या शतकाच्या अखेरीस असे म्हणत की, प्रत्येक देशातील शिक्षण हे त्या त्या देशाच्या सामाजिक परिस्थितीशी जोडलेलं असतं. पण आपण मात्र देशाशी संबंध नसलेल्या अनेक गोष्टी शिकत असतो. इंग्रजांनी मुख्यतः कारकून, वकील, डॉक्टर्स, मॅजिस्ट्रेटस आणि पोलीस निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांची भारतातील शिक्षणपद्धती आखली होती. त्यामुळे भारतातील शाळा आणि विद्यापीठं स्वतंत्रपणे न वाढता एखाद्या बांडगुळासारखी वाढताहेत. रविंद्रनाथ म्हणत, झाडाला ज्याप्रमाणे जमिनीतून जीवन रस मिळाले तरच ते तग धरू शकतं आणि जोमाने वाढतं त्याचप्रमाणे ज्या समाजात मूल जन्माला येत तसेच ज्या परिसरात ते वाढते त्या परिसरातील समाजातील संस्कृतीचा जीवनरस त्याच्या विकासासाठी त्याला सतत मिळणं आवश्यक असतं.


ज्याला आपल्या राष्ट्राच्या संस्कृतीची शाश्वत मूल्यं उमगली आहेत, इतिहासचं दर्शन घडत आहे, कलांच मर्म उमजलं आहे, विविध परंपरांच रहस्य उकलल आहे आणि ज्याने काही आदर्श आपल्या जीवनात डोळ्यांपुढे ठेवले आहेत, असाच गुरू आपल्या शिष्याला जीवनाचं खरं दर्शन घडवू शकतो. यासाठीच त्यांनी २२ डिसेंबर १९०१ या दिवशी शांतीनिकेतन ची स्थापना केली. या ठिकाणी मिळणारे शिक्षण १२५ वर्षे या प्रयोगाला झाले तरी जगामध्ये आदर्श मानले जाते. जगातील विविध ठिकाणी या धर्तीवरच त्या त्या ठिकाणच्या भाषेमध्ये शांतिनिकेतन सारख्या संस्था स्थापन केल्या जाऊन विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला त्या त्या ठिकाणच्या मातृभाषेतून शिकण्याची संधी दिली जाते.

लॉर्ड मेकॉले ज्यांचे पूर्ण नाव टॉमस बॅबिंग्टन मेकॉले होते. हे एक प्रसिद्ध ब्रिटिश इतिहासकार, लेखक आणि राजकीय नेता होते. ते भारतात इंग्रजी शिक्षण आणि भारतीय दंड समितीसाठी () ओळखले जातात. त्यांचा जन्म १८०५ मध्ये इंग्लंडमध्ये झाला. त्यांनी केंब्रीज विद्यापीठातून शिक्षण घेतले आणि तेथे ते उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून ते ओळखले जात होते. मेकॉलेने १८३५ मध्ये भारतीय शिक्षणावरील प्रोजेक्ट सादर करून भारतीय शिक्षण व्यवस्थेत इंग्रजीला अधिक महत्व देण्याची शिफारस केली. या गोष्टीला २०० वर्षे पूर्ण होण्यास एक दशकच कमी आहे पण आपण इंग्रजी हीच ज्ञानभाषा आहे असे मनाशी पक्के ठरविल्याने आपल्या मातृभाषेचे परिवर्तन ज्ञान भाषेत करण्यास घाबरत आहोत. एकदा आपली मराठी भाषा ज्ञानभाषा झाली कि, विज्ञान-तंत्रज्ञान यामध्ये कोरिया, जपान, चीन देशासारखी प्रगती आपण मराठीजन करू शकतो. रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध होण्यासाठी मातृभाषेचे ज्ञानभाषेत रूपांतर होऊन शिक्षणामध्ये सर्वस्तरावर त्याचा परिणाम झाला पाहिजे. आपली मराठी भाषा इंग्रजी भाषेच्या पेक्षा कित्येक शतकापूर्वीची जुनी असून ज्ञान भाषा होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेला केवळ संवादाचे साधन म्हणून न पाहता ज्ञानभाषा म्हणून विकसित केलं, तरच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि जागतिक स्तरावर महाराष्ट्राची ओळख निर्माण होईल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेला ज्ञानभाषा म्हणून अधिकृत स्थान देऊन तंत्रज्ञान, विज्ञान आणि शिक्षण याचं संपूर्ण मराठीकरण करावं. प्राथमिक शिक्षण पूर्णपणे मराठीतून देण्यावर भर देत त्यासाठी पुस्तकांमध्ये तंत्रज्ञान विज्ञान आणि गणिताचे शिकवणी निर्देश मराठीत तयार करावे. कोरियातील हंगुल प्रमाणे मराठीत डिजीटल साधने निर्माण करावीत. मराठी भाषा विकास प्राधिकरण स्थापन करून मँडरिन, जपानी, कोरियन भाषांसारखी तांत्रिक शब्दावली विकसीत करण्याची जबाबदारी सोपवावी.

# सत्योत्तर सत्य ह्या नव्या संकल्पनेची वैश्विक कादंबरी ‘‘चिंबोरेयुद्ध‘‘ - मा.भारत सासणे

**ज्योतिर्मय साहित्य**

चिंबोरेयुद्ध ही बाळासाहेब लबडे यांची अथर्व पब्लिकेशन ने प्रकाशित केलेली कादंबरी आहे. तिचं वैशिष्ट्य म्हणजे ती एक अतिरचना आहे .‘‘मेटामॉर्फिसिस‘‘ आणि ‘‘अँनिमल फार्मचा‘‘ या तोडीची ही कादंबरी आहे.तशी ही मस्त रूपककथा आहे. नवी कथनात्मकता या कादंबरीत आहे. नव्या वळणावरची ही कादंबरी आहे.माझ्यामते या कादंबरीत वैश्विकता आहे. महत्वाचं म्हणजे जे अकथ्य आहे ते कथ्य करण्याचा सफल प्रयत्न या कादंबरीत केला आहे.बाळासाहेब लबडे यांची चवथी कादंबरी आहे. या पुर्वीच्या कादंबरी परिसंवादात मी होतो तेंव्हा या कादंबरीच्या शैलीबाबत चर्चा घडली होती.आता मला लक्षात असं आणून द्यायचं आहे. मराठी कादंबरीचे दोन भाग पडतात.एक स्वातंत्र्यपुर्व कादंबरी आणि स्वातंत्र्योत्तर कादंबरी. असं आपण अभ्यासाच्या सोयीसाठी केलेलं आहे.आधी काय लिहीलं जात होतं आणि नंतर काय लिहीलं जात होतं असं महत्वाचं आहे. नव काय आपल्याला खुणावतं आहे? काय येऊन बसलं आहे?याची पुरेशी जाणीव आपल्याला नाही. त्यासंदर्भात ही कादंबरी फार महत्वाची आहे.या पुर्वी भाववादी आणि बुद्धीवादी अशा प्रकारचे झगडे कादंबरीमध्ये आले होते. ज्यामध्ये व्यक्ति आणि व्यक्तिचा संघर्ष रेखाटायचा किंवा नायिका, खलनायक रेखाटायचा. एक गोष्ट सांगायची नायक किंवा नायिकेची. अशा प्रकारचा जो पॅटर्न होता. धग,पाचोळा, इंधन,या सारख्या कादंबर्या होत्या. दुसर्या प्रकारच्या ज्या कादंबर्या होत्या त्या समूहवादी होत्या.समूहाला केंदरस्थानी मानून समूहाची कथा सांगण्याचा प्रयत्न त्यात झाला.अशा प्रकारचा झगडा चालू असताना आपल्याकडे अशा प्रकारच्या कादंबर्या यायला लागल्या होत्या.त्यात एक सुक्ष्म झगडा होता झगडा म्हणजे भांडण नाही तर सूक्ष्म संघर्ष होता. ज्यात प्रतिकवादी कादंबर्या, रूपवादी कादंबर्या, प्रायोगिक, काव्यात्मक, कलात्मक, इत्यादी इत्यादी लिहील्या जात होत्या .त्याला उत्तर म्हणून वास्तववादी कादंबरी लिहीली जात होती. त्यानंतर ‘‘मर्त्य आणि अधोलोक‘‘ ‘‘एन्कीच्या राज्यात‘‘ या कादंबर्या लिहील्या गेल्या. नंतर तर केवळ बातम्यांवर कादंबर्या लिहिन्यात आल्या.केवळ पत्र अशा प्रकारची कादंबरी लिहिली गेली. अशा प्रकारच्या अनेक प्रयोगात्म कादंबर्या लिहिन्यात आल्या आहेत. अशा सगळ्या कादंबर्यांना एकाबाजुने नाकारण्याचा प्रयत्न झालेला होता.त्याऐवजी वास्तववाद असला पाहिजे असं म्हटलं गेलं किंवा ही कचकड्याची कादंबरी आहे असं म्हटलं गेलं.चिं. त्र्य. खानोलकारांच्या कादंबर्यांना नाकारलं गेलं. कारण त्यात पौगंडावस्थेत असलेल्या लेखकाने लिहिलेलं आहे. त्यात वास्तवता कुठं आहे? त्यात सामाजिकता कुठं आहे?अशा प्रकारचे प्रश्न विचारले गेले हे आपणा सर्वांना माहित आहे.जे अकथ्य आहे ते मला कथ्य करायचं आहे.मग त्यासाठी काय करायचं? कारण वास्तववादाची आपली मर्यादा आहे. त्याचा अंगीकार मला करता येत नाही.त्याच्या पलिकडं गेलं पाहिजे त्या पार्श्वभूमीवर बाळासाहेबांची ‘‘चिंबोरेयुद्ध‘‘ ही कादंबरी येते. तिच्याकडे कोणत्या नजरेनं पाहिलं पाहिजे.तिचं विश्लेषण कोणत्या निकषांनी करायचं याची चर्चा आपणास आज ना उद्या करावी लागेल. कारण हिचे जे स्कूल आहे. ती बाळासाहेबांचं स्कुल चालवणारी कादंबरी येईल असे नाही.तिचं अनुकरण होऊ शकत नाही संप्रदाय निर्माण होऊ शकत नाही. कारण त्यांनी स्वता:ची शैली निर्माण केली. त्याचं




अनुकरण होणारचं नाही.त्यांनी ज्या कादंबर्या टप्प्याटप्प्याने लिहील्या त्याचा क्रमश:विकास झालेलाच आहे. त्यामुळे आपल्याला यात काय शोधायचं आहे. तर पोष्ट टुथ नावाची भानगड आपल्या समोर येते आहे. ती आपण समजून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. सत्योत्तर सत्य म्हणजे काय आहे ? जे वास्तववादी सत्य तुम्हाला सांगता येत नाही ते सांगण्याची ही पद्धती आहे म्हणजे वास्तववादाच्या पलिकडील हे सत्योत्तर सत्य आहे.सत्याच्या पलिकडंचं आहे म्हणून ते पोष्टट्रुथ आहे. त्या प्रकारामध्ये बसणारी ही कादंबरी आहे असा माझा स्वता:चा अंदाज आहे.

‘‘सत्योत्तर सत्य‘‘ ही संकल्पना साहित्यिक दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे, विशेषतः कादंबरीच्या संदर्भात. ही संकल्पना वास्तववादाच्या पुढील टप्प्याशी निगडित आहे, जिथे सत्याला वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जाते आणि ते कथानकाच्या गरजेनुसार साकारले जाते.

**पुस्तक परीक्षण**

**डॉ. भारत सासणे.**

सामान्यतः ‘‘सत्य‘‘ म्हणजे वास्तव घटना किंवा तथ्य. परंतु, सत्योत्तर सत्य हे त्या सत्याचा एका वेगळ्या स्वरूपात पुनरुत्पादन करण्याचा प्रयत्न असतो. कादंबरीच्या संदर्भात, हे संकल्पनात्मक वास्तव म्हणून पाहिले जाते, जिथे लेखक वास्तविकतेला कल्पनेच्या, मानसिकतेच्या आणि वैचारिकतेच्या दृष्टिकोनातून मांडतो.

कल्पनारंजन आणि वास्तवाचा मिलाफ: काही कादंबऱ्या अशा असतात ज्या पूर्णतः कल्पनारम्य नसतात, पण त्या वास्तवाला वेगळ्या पद्धतीने मांडतात. उदा. जॉर्ज ऑरवेलची १९८४ ही कादंबरी वास्तववादी असूनही भविष्यातील संभाव्य सत्याचे चित्रण करते.

भावनात्मक आणि मानसशास्त्रीय सत्य: पात्रांच्या मनोव्यापारातून प्रकट होणारे सत्य हे नेहमीच वस्तुनिष्ठ नसते. त्यांच्या भावना, पूर्वग्रह, समाजातील अनुभव यांच्या आधारे ते एक वेगळे सत्य निर्माण करते.

प्रसंग आणि संवादांमध्ये लवचिकता: काही वेळा संवाद आणि प्रसंग हे १००% वास्तवावर आधारित नसतात, पण ते त्या परिस्थितीत सुसंगत वाटतात आणि व्यापक सत्य प्रतिबिंबित करतात.

व्यक्तिसापेक्ष आणि समाजसापेक्ष सत्य: कादंबरीमध्ये प्रत्येक पात्राचे स्वतःचे सत्य असते. एकाच घटनेला वेगवेगळी पात्रे वेगळ्या प्रकारे पाहतात आणि त्यानुसार कथा घडत जाते.

मार्खेजच्या ‘‘ ‘‘ मध्ये जादुई वास्तववादाच्या माध्यमातून वास्तव आणि कल्पनेचा मिलाफ आढळतो.

‘‘सत्योत्तर सत्य‘‘ ही संकल्पना कादंबरीच्या संदर्भात सत्याला वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्यास मदत करते. लेखक सत्याला पूर्णतः प्रत्यक्ष स्वरूपात न सादर करता, त्याच्या विविध छटांचा विचार करून ते अधिक प्रभावी आणि अर्थपूर्ण बनवतो.

त्याच्या पाठोपाठ त्यात वैश्विकता आहे.युनिव्हर्सल अशा प्रकारचे सर्व इलेमेंट त्यात सापडतात.त्यात करूणा आहे त्याशिवाय इतक्या थेट पद्धतीने मांडता आलं नसतं. तेही रूपकात्मकतेतून. त्यात विश्व करूणा आहे.समाजाबद्दल या लेखकाला अतिशय तळमळ वाटते आहे. प्रबोधन केलेले आहे पण छुपं असं केलेले आहे.विश्वमानव कल्याण त्यांना अपेक्षित आहे. अकथ्य वास्तवाचा निवेदन करण्याचा प्रयत्न आहे. सूचकता, संदिग्धता या गोष्टीतर येतातच कारण यात काही क्रम नाही. आधी काय येतं?मग काय येतं?कथा कुणाची आहे?पारंपरिक निवेदनपद्धती अगदी मोडून काढली आहे.नायक मग आपलं कथानक किंवा एक दोन उपकथानक सांगायला लागतो अशा प्रकारचा कोणताही शैलीवाद यात नाही. मग यात काय आहे? भावबुद्धीला आवाहन आहे का?ज्याला आपण इन्टेल्युक्च्युअल इमोशन्स म्हणू शकतो का?शंका वाटते.कारण हा शब्द जेंव्हा वापरला होता तेंव्हा यावर आक्षेप घेतला गेला. म्हणजे काय? इमोशन्स वेगळे आणि इंटेलेक्चुअल अँसपेस्क्ट्स वेगळे. कसं काय होऊ शकतं भावबुद्धीला आवाहन करणारं कसं काय लिहिलं जाऊ शकतं? पण चिंबोरेयुद्ध मध्ये हे लिहिलं गेलं आहे.त्यामुळे बाळासाहेबांची ही कादंबरी जी आहे ती या सर्व वैशिष्टयांना पात्र ठरते. त्यांनी या कादंबरीचा शेवट केलेला आहे. त्यांनी म्हटलं आहे,‘‘ प्रत्येकजन दुसऱ्याला आरसा दाखवतो. हे युद्ध अनादिकाळापासून चालू होते पुढे चालू राहणार आहे. हे स्टेटमेंट आहे त्यांचे अतिशय महत्वाचं असं स्टेटमेंट आहे.म्हणून लोक जीवंत आहेत तो पर्यंत चालू राहील. चिलापी पक्ष जोमात आहे. पक्ष खुला आहे. साम, दाम, दंड, भेद, वापरून चिंबोरे पुढच्या निवडणूकीत जिंकायच्या तयारीत आहेत.परंतु तो पर्यंत चिंबोर लोकशाही टिकायला तर हवी. ही जी आजची आपली तळमळ आहे ती त्यांनी यात व्यक्त केली आहे.म्हणून हे चिंबोरेयुद्ध सुरू आहे.मतदार चिबोरे आपल्या मतास काहीच किंमत नाही या विवंचनेत आहेत.नवीन निवडणूक होणार की नाही? यामुळे आपल्या तिघांना मुक्ति नाही.म्हणजे या पात्रांना मुक्ति नाही. ‘‘हा जो त्यांनी दिलेला विचार आहे विशाल आहे.आपण एका मोठ्या भ्रमयुगामध्ये प्रवेश केला आहे. ते भ्रमयुग अशा प्रकारच्या निर्मितीला योग्य असे वातावरण तयार करते आहे.यातुन एक भ्रम निर्माण होतो. आहे की नक्की काय आहे?कुठे जायचे आहे? सत्य काय आहे? सत्याच्या पलिकडे जाऊन हा लेखक सत्य सांगतो आहे. अशा प्रकारच्या एका निसटत्या निष्कर्षापर्यंत मी येऊन पोहचलो आहे.त्याचं मी अभिनंदन करतो.याचा अनुवाद झाला तर जगभरातील वाचकाचं लक्ष ही वेधुन घेईल. बाळासाहेब यांनी एक महत्वपुर्ण वेगळी अपारंपरिक, प्रायोगिक, रूपकात्मक. कादंबरी लिहीली आहे याचा मोठा आनंद आहे.वेगळ्या प्रकटीकरणाकडे तो गेले आहेत.मराठी साहित्याने त्यांच्या लेखनाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

# भूतांची वस्तीस्थानं

**ज्योतिर्मय साहित्य**



असेच एके दिवशी घरात टेबलवर तळहाताच्या अर्ध्या आकाराचा छोटासा आरसा ठेवलेला दिसला आणि तो पाहताच मनात एक भितीची रेषा उमटून गेली. घरी विचारले की हा आरसा कुठुन आला. समजले की संक्रातीमध्ये कुणीतरी वाणाला दिला आहे. पण तो पाहून मनात भिती का उमटली याचा विचार केला. बालपणी मनात दडलेली भिती वर आली. लहानपणी गावाच्या जवळ असलेली शेतं म्हणजे मुलांची खेळण्याची ठिकाणं. आमच्या गावात आमचं राहण्याचं ठिकाण गावाच्या दक्षिण बाजूस. गांवठाण क्षेत्र संपलं की त्यालगत एक गाडीवाट ज्याला पानंद किंवा पांद असेही म्हणतात आणि त्यानंतर पांढरीची शेतं. मुले सतत त्या पांढरीत खेळायचे. या पांढरीला लागून एक आकडयाचा वाडा आहे. वाडयाची दक्षिणेची बाजू म्हणजे वाडयाची पाठभिंत भली उंच आहे. या पाठभिंतीच्या पाठीमागे गाडीवाटेला लागून एक बाभळीचे झाडं होतं. आणि त्या झाडाखाली अनेक वेळा एका सुपामध्ये सुई, दाबन, आरसा, फणी, बांगडया, हळद, कुंकु, पिवळा भात, तेलची अशा वस्तु ठेवल्या जात असत. त्या पाहिल्या की मनामध्ये एकदम भिती निर्माण व्हायची व त्यानंतर आठ-पंधरा दिवस त्या जागेकडे आम्ही फिरकत नसत. ती मनात बसलेली भिती छोटासा आरसा पाहून अचानक वर आली.

अशा वस्तु गाडीवाटेवर ठेवण्याची कारणे आईला विचारले असता सवासिन बाई मेल्यानंतर लागु नये यासाठी तिच्या शांतीसाठी अशा वस्तु टाकत असतात. आणि ती मरणारी बाई मांसाहारी असेल तर अंडी, कोंबडी किंवा कोंबडीचे पिल्लु टाकतात. हे सर्व सांगणारे आणि भुत लागले आहे किंवा नाही पाहणारे प्रत्येक गावात दोनचार माणसं किंवा बाया असतात. मुलं, माणसं आजारी पडले की दवाखान्याचा इलाज करण्यापेक्षा अगोदर ते जाणत्याकडे जाऊन त्यास कांही बाधा झाली आहे का ते पाहतात. आणि त्यातून कांहीतरी एखादं भूत उभा राहतच.

अशाच प्रकारे आमच्या शिवारात आबाचा आंबा नावाचं एक झाडं होतं. त्यावेळी जवळपास बऱ्याच लोकांना आबाच्या आंब्याखालचं भूत लागायचं. हा आबा कोण होता. कोणत्या काळात होता हे कांही माहिती नाही. परंतु पिढयान् पिढया आबानं गावातील लोकांना धरुन ठेवलं होतं. जाणत्यांनं भूत काढून दिलं की सूर्यास्तानंतर कुणाला न दिसता, डोक्यावर पोत्याचं घोंगतं घेऊन ते ताट आब्याच्या आंब्याच्या दिशेला गावापासून कांही दूर अंतरावर टाकून यावे लागे. यात पण कांही नियम होते. टाकून परत येताना कुणाला बोलायचे नाही, मागे वळून पाहायचे नाही, आल्यानंतर हातपाय स्वच्छ धुवून घरात यायचे. त्या माणसानं चुकुन जरी मागे पाहिले तर दोन दिवसात त्याला ताप यायचा. पळत्याच्या पाठीमागे भुतं असं म्हणतात ते खरेच आहे. एखादया संकटकाळी माणुस धैर्याने तोंड देतो त्यावेळी संकटावर मात करीत असतो. परंतु संकटांना ज्यावेळी टाळून येत असतो त्यावेळी संकटे मागे लागतात व ते पाठीवरच असतात.




असेच आणखी एक भूत उदयाला आलं होतं ते म्हणजे पारुमाय. सिरसी पाटी आणि माकणी हे साधारण एक किमीचे अंतर आहे. परंतु माकणी गांव एक खेडेगांव असल्यामुळे गावापर्यंत वाहनाच्या सोयी नव्हत्या. बाहेरगांवी जायचे तर सिरसीपाटी या बसस्टॉपवरुन प्रवास होता. रात्रीच्या वेळी सिरसीपाटीवर उतरले की रोडने पायी यावे लागे. पारुमायचा अंत्यविधी नेमका त्या रस्त्यावरील पुलाच्या शेजारी केलेला होता.

त्यावेळी ती सुध्दा भुत बनून लोकांच्या मागे लागायची. त्या रस्त्याने जाणाऱ्या लोकांना पारुमाय दिसली अशाही चर्चा व्हायच्या. या सर्व गोष्टीचा परिणाम लहान मुलांवर जास्त व्हायचा. पारुमायला बिडी प्यायची सवय त्यामुळे ती कुणाकुणाला बिडी, चुट्टा मागायची. तिला शांत करण्यासाठी त्या पुलाच्या जवळ बिडीचे बंडल, चुट्टा काडीपेटी ठेवली जात.

त्याच काळात मी निलंगा येथे आयटीआय करीत होतो. उशीर झाला आणि थोडासा जरी अंधार झाला की सिरसी पाटीहून गावात जाण्याच्या रस्त्यावर पारुमायचा थांबा लागायचाच. बराच वेळ प्रतिक्षा करुन कुणीतरी जोडीदार भेटेल यांची वाट पाहायची. शेवटी कुणी आलेच नाही तर घरी जाण्याशिवाय पर्याय नसायचा. त्यावेळी मात्र मन घट्ट करुन एकटयाने त्या रस्त्यावरुन प्रवास करुन जायचे. त्या पुलाच्या कांही अंतरावर पोहोचले की मनात भिती सुरु व्हायची. त्यावेळी एकच पर्याय होता. मनामध्ये सतत रामजप करणे. तिथं गेले की मनात राम राम राम राम राम राम राम असा सतत जप करीत हळू हळू पुलाचे अंतर पार पाडायचे आणि जसे पुल पार केला तसे पूर्ण शक्तीनिशी गावापर्यंत पळत जायचे. गावाच्या बाहेर असलेल्या घरापर्यंत पोहोचले, त्या घरातील दिवे दिसले की आपण जिंकलो याचे समाधान लाभे. अशावेळी देवाच्या धावा करण्याऐवजी कांही पर्याय नसतात कारण ते बाळकडू आपणास आलेले असते. सापाची भिती वाटली की अस्तिकमुनीची शपथ, अंधाराची भिती तिथं रामाचा किंवा हनुमानाचा जप आपोआप येतो. त्यासाठी प्रशिक्षण देण्याची गरज भासत नाही.

आज ती कोणतीच भुतं नाहीत किंवा त्या भुताच्या ठिकाणावर भुताचं अस्तित्व नाही. माणसांचीच संख्या एवढी जास्त झाली तर आता भुताला कुठे जागा आहेत. मोठमोठया झाडांच्या परिसरात अंधाऱ्या रात्री वाटणारी भिती भुत बनून उभी राहत असे. रात्री माळवदावर झोपले की म्हातारी माणसं मुलांना त्याच भुताच्या गोष्टी सांगत असत. त्या गोष्टी ऐकल्या की मनामध्ये भुत घर करुन उभी राहत असत. आजारपणामध्ये उपचाराच्या पध्दती आल्या, दवाखाने आले, मानसिक रोगी असतील तर त्यासाठी सुध्दा दवाखाने आले. असे असले तरीही बऱ्याच ठिकाणी दवाखान्याच्या उपचाराने बरे वाटत नसेल तर बाहेरचं कांही लागलय का बघा असे शहरातून सुध्दा गावाकडे फोन येतात. एखादं नारळ उतरवून टाकलं जातं. भुताची वस्तीस्थानं ही आबाचा आंबा किंवा पारुमायचा पुल नाही तर प्रत्येकाच्या मनामध्ये आहेत. प्रत्येकांच्या मनाला भुतांनी व्यापून टाकलेलं आहे. ही भुतं मनात घेऊन माणसं जिथं जिथं गेली तिथं भुतंसुध्दा सोबतच गेली. त्या भुतांनी शहरात आलेल्या लोकांना सुध्दा जखडून ठेवलेलं आहे. काय माहिती कदाचित ही भुतं परदेशातही जात असावीत. त्यामुळं दवाखान्यामध्ये नंबर लावून तपासणी करण्याच्या बरोबरीने गावात सुध्दा भुत पाहणाऱ्यांकडे गर्दी आजसुध्दा आहे.

आता एकाच जागेवर स्मशानभुमीत अनेक लोकांचे अंत्यसंकार होत असतात. भुतांनाही वेगळी घरं नाहीत. त्यांनी आपला ठसा उमटवावा अशी त्यांना स्थानं नाहीत. म्हणून भुताचं घर हे माणसाचं मनच आहे. मनात निर्माण होणाऱ्या भावनेनुसार भुताचं अस्तित्व आहे. म्हणतात त्याच्या वर भुत सवार झालं आहे, एखादयाच्या डोक्यात भुत शिरलं आहे. कांही चित्रपटाच्या कथानकानुसार भुतं माणसांच्या मनावर अधिराज्य गाजवतात. असेही म्हटलं जातं की अतृप्त आत्मे भुत बनून फिरतात. एकंदरीत भुत हे एक आजच्या चित्रपट सृष्टीचं आणि मालकांचं भरघोस उत्पन्नाचं साधन झालं आहे. त्यात दक्षिणी चित्रपटांमध्ये मोठया प्रमाणात दिसून येते. भुताबद्दल माणसांच मनामध्ये कुतुहल आहे म्हणूनच भुतांचे चित्रपट चांगली कमई करतात. अशा भयानक आणि भितीदायक चित्रपट पाहण्यात लोकांना सुध्दा खुप मजा येते. परंतु ती आता भिती नाही तर केवळ करमणुक झाली आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559